# ॥ ज्योतिर्मय ॥

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक २२७ वा ❑ शनिवार दि.०१ नोव्हेंबर २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


विशेष लेख...

## आंदोलनादरम्यान होणारी वाहतूक कोंडी चिंताजनक

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

**ज्योतिर्मय साहित्य**

आंदोलना दरम्यान ''रस्ता रोको'' (नाकाबंदी) आंदोलन चुकीचे आहे की नाही हे एखाद्याच्या दृष्टिकोनावर अवलंबून असतो. काहींचा असा विश्वास आहे की यामुळे सामान्य लोकांना गैरसोय आणि त्रास होतो, तर काहींचा असा युक्तिवाद आहे की ते एखाद्याच्या मागण्या पूर्ण करण्यासाठी एक आवश्यक आणि प्रभावी माध्यम आहे.

आंदोलनादरम्यान हिंसा होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या पार्श्वभूमीवर आंदोलकांनी रस्ता रोको आंदोलने करू नये. अनेक आंदोलनाला हिंसेचे स्वरूप मिळाले. रस्ता रोको मुळे अनेकांचे प्राण गेले. आंदोलन कोणत्याही प्रकारचे का असेना त्या आंदोलकांना रस्त्याची नाकाबंदी करू देऊ नये.सुरक्षित प्रवास हा जनतेचा मूलभूत अधिकार आहे.रस्तावर जनतेची कोंडी होत असेल तर हा प्रकार मानवी अधिकाराचे उल्लंघन करणारा आहे.

आपल्या मागण्या प्रभावीपणे शासनापर्यंत मांडण्यासाठी वापरली आंदोलक रस्ता रोको आंदोलन करतात. सरकारचे लक्ष वेधून घेण्याचा हा एक प्रकार आहे. ही एक आंदोलनाची रणनीती आहे. परंतु रस्ता रोको मुळे जनतेची गैरसोय होत असते आणि हा वादाचा विषय बनू शकतो. काहींचा असा विश्वास आहे की रस्ता रोको आंदोलने टाळल्याने चळवळीची विश्वासार्हता टिकून राहते, तर काहींचा असा युक्तिवाद आहे की ही चळवळ अधिक मजबूत आणि प्रभावी बनवण्याचा एक मार्ग आहे. आपल्या मागण्या शासनापर्यंत पोहोचविण्याचा एक प्रभावी मार्ग म्हणजे आंदोलन करणे, रस्ता रोको करणे, मोर्चा काढणे.ही एक प्रभावी पद्धत असू शकते.कोणत्याही चळवळीला लक्ष वेधून घेण्यास आणि तिच्या मागण्या प्रभावीपणे मांडण्यास मदत करू शकते. सरकारवर दबाव आणण्याचा हा एक मार्ग असू शकतो.

**आंदोलन करणे मोर्चा काढणे**

हा संविधानिक अधिकार असला तरी आंदोलनादरम्यान होणाऱ्या वाहतूक कोंडीमुळे सर्व सामान्य जनतेला त्याचा नाहक त्रास होतो. एका विशिष्ट वेळेत प्रत्येकाला त्यांच्या ठिकाणी त्यांना पोहोचायचे असते. वेगवेगळ्या कारणासाठी नागरिक रस्त्याने ये –जा करतात. आंदोलक जर रस्त्यावर बसले त्यांनी वाहतुकीची कोंडी केली तर त्याचा फटका जाणाऱ्या येणाऱ्या नागरिकांना बसतो. ॲम्बुलन्स, वैद्यकीय कारणांसाठी जाणारे प्रवाशी वाहतूक कोंडीमुळे अडकून पडतात.म्हणून आंदोलनादरम्यान वाहतूक कोंडी होणार नाही याची दक्षता आंदोलनकर्त्यांनी व सरकारने घ्यायला पाहिजे. कारण वाहतूक कोंडीचा फटका सर्वसामान्य जनतेला बसत असतो.आंदोलनांमुळे होणाऱ्या वाहतूक कोंडीमुळे सामान्य जनतेला, विशेषतः प्रवाशांना आणि व्यापाऱ्यांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागतो. केवळ सामान्य जनताच नव्हे तर अनेक रुग्णांना देखील यामुळे मनस्ताप सहन करावा लागतो.

शेतकरी आंदोलनामुळे वर्धा मार्गावर वाहतूक कोंडी झाली. त्याचा फटका सर्वसामान्य नागरिकांना बसला. केवळ सामान्य जनताच नव्हे तर अनेक रुग्णांना देखील यामुळे मनस्ताप सहन करावा लागला. या मार्गावर असलेल्या रुग्णालयातील उपचारांसाठी जाणारे रुग्ण वाहतूक कोंडीतच अडकले. त्यात काही कॅन्सरग्रस्तांचा देखील समावेश होता. मध्यरात्रीच्या सुमारास देखील अनेक रुग्णवाहिका कोंडीत अडकल्याचे दिसून आले होते. शेतकऱ्यांनी त्यांच्या मागणीसाठी आंदोलन करावे. मात्र सर्वसामान्य जनतेला वेठीस धरू नये असा संतप्त सवाल जनते मधून येत आहे.

नागपूरकडे येणाऱ्या व नागपुरातून बाहेर जाणाऱ्या मार्गावर अनेक रुग्णवाहिका देखील अडकल्या होत्या. त्यातील रुग्णांची या कोंडीमुळे प्रचंड हाल झाल्याचे दिसून आले. या दरम्यान अनेकांना पायपीट करावी लागली. अनेक रुग्ण. रस्त्यातच अडकले महिलांना रात्रभर रुग्णालयात राहावे लागले.

झारखंडमधील कुर्मी समुदायाने सप्टेंबर मध्ये रेल रोको आंदोलन केले होते.या आंदोलनामुळे १०० हून अधिक गाड्या रद्द करण्यात आल्या किंवा वळवण्यात आल्या होत्या अनुसूचित जमातीचा दर्जा आणि कुडमाळी भाषेला मान्यता देण्याची मागणी तीव्र झाली करण्यासाठी हे आंदोलन करण्यात आले होते.

झारखंडमधील कुर्मी समाजाचे आंदोलन अधिक तीव्र झाले होते.२० सप्टेंबर २०२५ रोजी रेल रोको आंदोलनाचा भाग म्हणून अनुसूचित जमातीच्या (कुर्मी समुदायाच्या) सदस्यांनी अनेक गाड्या विस्कळीत केल्या.ते अनुसूचित जमातीचा दर्जा आणि संविधानाच्या आठव्या अनुसूचीमध्ये कुडमाळी भाषेचा समावेश करण्याची मागणी करत आहेत. ''रेल रोको'' आंदोलनामुळे आग्नेय आणि पूर्व मध्य रेल्वेच्या अनेक विभागांमध्ये १०० हून अधिक गाड्या रद्द करण्यात आल्या, मार्ग बदलण्यात आल्या किंवा मध्यभागी थांबवण्यात आल्या, ज्यामुळे हजारो प्रवासी अडकून पडले आणि रेल्वेचे कामकाज पूर्णपणे विस्कळीत झाले होते.

रस्ता रोको आंदोलनामुळे जनतेला त्रास होतो आणि अराजकता पसरते, ज्यामुळे सामान्य जीवन आणि अर्थव्यवस्थेवर नकारात्मक परिणाम होतो. ''रास्ता रोको'' निषेधादरम्यान सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करणे किंवा हिंसाचाराचा वापर करणे कायदेशीर आणि नैतिकदृष्ट्या चुकीचे मानले जाते. तथापि, काही देशांमध्ये शांततेने रस्ते किंवा रेल्वे रोखणे अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या अंतर्गत संरक्षित केले जाऊ शकते.ते देखील कायद्याच्या चौकटीत राहून.




# वेदनेतून निर्माण झालेली 'प्रक्षोभ' कलाकृती मराठी साहित्यातील वैभव-डॉ. श्रीपाल सबनीस

## डॉ. प्रकाश जाधव लिखित 'प्रक्षोभ' कादंबरीचे प्रकाशन

**ज्योतिर्मय साहित्य**

**पुणे** – गावकुसाच्या आतील आणि गावकुसा बाहेरील अनेक व्यक्तिरेखा डॉ. प्रकाश जाधव यांनी मनोविश्लेषणात्मक पद्धतीने 'प्रक्षोभ' या कादंबरीत मांडलेल्या आहेत. बुद्धिवादी संवेदनशील मनाचा प्रकाश या कादंबरीतून दिसतो आहे. वेदनेतून निर्माण झालेली ही कलाकृती मराठी साहित्यातील वैभव आहे, असे गौरवोद्गार अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष, ज्येष्ठ विचारवंत डॉ. श्रीपाल सबनीस यांनी काढले. वेदनेच्या जंजाळात अडकलेल्या या नायकाने कांदबरीच्या माध्यमातून आयुष्याचे सोने करण्याचा प्रयत्न केला आहे, असेही ते म्हणाले.

डॉ. प्रकाश जाधव लिखित 'प्रक्षोभ' या कादंबरीच्या दुसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन



आज (दि. २८) ज्येष्ठ लेखिका इंदूमती जोंधळे यांच्या हस्ते झाले. त्या वेळी डॉ. श्रीपाल सबनीस अध्यक्षपदावरून बोलत होते. ज्येष्ठ लेखक भीमराव पाटोळे, सुप्रसिद्ध लेखक देवा झिंजाड, महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्यवाह शिरीष चिटणीस, सकाळ प्रकाशनचे प्रमुख आशुतोष रामगीर, मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. संदीप सांगळे मंचावर होते.

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या माधवराव पटवर्धन सभागृहात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सकाळ प्रकाशनतर्फे पुस्तक प्रकाशित करण्यात आले आहे.

लेखकाने अनेक पात्रांची वास्तव भाषेत केलेली मांडणी भावते, असे सांगून डॉ. सबनीस पुढे म्हणाले, मनोविश्लेषणात्मक केलेले लिखाण हा या कादंबरीचा आत्मा आहे.

भीमराव पाटोळे म्हणाले, जगण्यासाठी आयुष्यभर संघर्ष करणाऱ्या समाजासाठी ही कादंबरी मार्गदर्शक ठरणारी आहे. शालेय वयात मराठी बोलता, लिहिता न येणाऱ्या व्यक्तीला कादंबरी लिहिता येणे ही एक प्रकारे दैवी शक्ती आहे.

जगणे, भोगणे आणि लिहिणे यातील अंतर खूप कमी असलेला डॉ. प्रकाश जाधव हा माणूस आहे. लिखाणातून त्यांच्या मनाची अस्वस्थता दिसून येते. घरातूनच त्यांच्या शिक्षणाला विरोध झाला नसता तर ते लिहिते झाले नसते. आयुष्यात भोगलेल्या हालअपेष्टा लिखाणातून रिते करण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे. आयुष्यात जे घडले ते त्यांनी प्रांजळपणे मांडले आहे.

इंदूमती जोंधळे म्हणाल्या, समाजाचे देणे लागतो या भावनेने डॉ. प्रकाश जाधव यांनी स्वत:च्या शिक्षणासाठी पैसा नसतानाही २५ मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी घेतली यासाठी मोठे औदार्य लागते. हलाखीची परिस्थिती असतानाही शिक्षणाद्वारे ते स्वत: प्रकाशनमान झाले त्याचप्रमाणे इतरांच्या आयुष्यातही त्यांनी प्रकाश दिला. लेखनाविषयी मनोगत व्यक्त करताना डॉ. प्रकाश जाधव म्हणाले, शिक्षण, लिखाणामुळे जीवनाकडे बघण्याचा दृष्टीकोन मिळाला. मराठी भाषेची जबाबदारी केवळ अभिजनांनीच घेतलेली नाहीये तर आम्ही सुद्धा घेतली आहे, हे मुद्दाम सांगावेसे वाटते. शिरीष चिटणीस यांनी मान्यवरांचा परिचय करून दिला तर स्वागत आशुतोष रामगीर, रश्मी जाधव यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अपर्णा जोग यांनी केले. आभार डॉ. संदीप सांगळे यांनी मानले.

# भारतीयांच्या हृदय-सिंहासनावर वंदे मातरम्‌चे स्थान अढळ-पार्थ चॅटर्जी

**ज्योतिर्मय साहित्य**

**पुणे** – वंदे मातरम् हे गीत राष्ट्रप्रेम आणि राष्ट्रभक्तीने ओतप्रोत भरलेल्या राष्ट्रचिंतनाचे प्रतीक आहे. हे गीत म्हणजे केवळ शब्द नसून भारताचा आत्मा आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात वंदे मारतम् या गीताने क्रांतिकारांना प्रेरित केले. वर्तमानकाळात एक नवीन विचार देत देशप्रेमाची जागृती निर्माण केली आणि भविष्यकाळात आपला देश आत्मनिर्भर होण्यासाठी, वैश्विक पातळीवर महासत्ता बनविण्यासाठी हे गीत प्रेरणा देईल, असा विश्वास ऋषी बंकिमचंद्र यांचे वंशज पार्थ चॅटर्जी यांनी व्यक्त केला.



ऋषी बंकिमचंद्र लिखित 'वन्दे मातरम्' या राष्ट्रमंत्राच्या निर्मितीस तिथीनुसार कार्तिक शुद्ध नवमीला (दि. ३१ ऑक्टोबर २०२५) १५० वर्षे पूर्ण झाली. या निमित्ताने आज (दि. ३१) 'वन्दे मातरम्' गौरव महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. महोत्सवाचे उद्घाटन ऋषी बंकिमचंद्र यांचे वंशज पार्थ चॅटर्जी यांच्या हस्ते झाले. त्या वेळी ते बोलत होते.

मएसो सिनिअर कॉलेज, वन्दे मातरम् सार्ध शती जयंती समारोह समिती, पाञ्चजन्य फाउंडेशन आणि जन्मदा प्रतिष्ठानतर्फे मएसो सभागृह, मयूर कॉलनी, कोथरूड येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष एअर मार्शल भूषण गोखले (निवृत्त) होते.

जन्मदा प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष मकरंद केळकर, वंदे मातरम्‌चे अभ्यासक मिलिंद सबनीस, मएसो सिनिअर कॉलेजचे प्राचार्य डॉ. रवींद्र वैद्य, पाञ्चजन्य फाउंडेशनचे सचिव समीर कुलकर्णी मंचावर होते.

पार्थ चॅटजी पुढे म्हणाजे, ऋषी बंकिमचंद्र यांनी रचलेल्या वंदे मातरम् या राष्ट्रमंत्राने भारताच्या स्वातंत्र्यसंग्रामाला एक नवे वळण दिले. वंदे मातरम् मंत्राने आपल्या प्राचीन संस्कृतीच्या या मातृपूजक परंपरेला पुनरुज्जीवित केले आहे. वंदे मातरम् या मंत्राने लहानांपासून वृद्धांपर्यंत, महिलांपासून निःशस्त्र सत्याग्रहींपर्यंत तसेच सशस्त्र संग्राम करणाऱ्या क्रांतिकारकांनाही विदेशी सत्तेविरुद्ध लढण्याची प्रेरणा दिली. गेल्या १४९ वर्षांपासून भारतीयांच्या हृदय-सिंहासनावर वंदे मातरम्‌चे जे स्थान निर्माण झाले आहे ते अद्यापपर्यंत कुणीही हिरावून घेऊ शकलेले नाही.

अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना भूषण गोखले म्हणाले, बंगाल आणि महाराष्ट्राचे वेगळे नाते आहे. बंगाल प्रमाणेच महाराष्ट्रालाही क्रांतिकारकांची परंपरा लाभली आहे. स्वातंत्र्यापूर्वी आणि स्वातंत्र्यानंतरही वंदे मातरम् या गीताने सर्व भारतीयांना एकत्र आणले आहे.


डॉ. रवींद्र वैद्य यांनी स्वागतपर प्रास्ताविक केले तर 'वन्दे मातरम् १५०' या कार्यक्रमाविषयी तसेच ऋषी बंकिमचंद्र यांच्या जीवनातील कार्तिक शुद्ध नवमीचे महत्त्व या विषयी मिलिंद सबनीस यांनी माहिती दिली. पार्थ चॅटर्जी यांचा सत्कार भूषण गोखले यांच्या हस्ते करण्यात आला. सरस्वती वंदनेने कार्यक्रमाची सुरुवात झाली. सौम्या महाडिक आणि श्रावणी अत्रे यांनी भू-माता स्तोत्र सादर केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रमा कुलकर्णी यांनी केले तर आभार समीर कुलकर्णी यांनी मानले.

**आणि उलगडला वंदे मारतम्‌चा इतिहास..**

भारतीय स्वातंत्र्य लढ्याचा युद्धघोष असणाऱ्या बंकिमचंद्र चट्टोपाध्याय लिखित 'वंदे मातरम्' या तेजस्वी काव्याच्या धगधगता, रोमांचक इतिहास पुणेकरांनी अनुभवला. निमित्त होते 'वन्दे मातरम् १५०' या कार्यक्रमाचे. वंदे मातरम् च्या निर्मितीला १५० वर्षे झाल्यानिमित्ताने दृकाश्राव्य आणि अभिवाचनात्मक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. वंदे मातरम् गीताचे पहिले जाहीर गायन, वंदे मातरम् शब्दाचा सामाजिक प्रभाव, कला क्षेत्रातही वंदे मातरम् गीताला मिळालेले स्थान, अनेक गायक व संगीतकारांना या गीताची पडलेली भुरळ, स्वातंत्र्य मिळण्याची आशा निर्माण झालेली असताना वंदे मातरम् गीतास झालेला विरोध, वंदे मातरम् हे राष्ट्रगीत न होता राष्ट्रीय गीत होऊन लाभलेला दर्जा असे विविध टप्पे अभिवाचन आणि दृकश्राव्य माध्यमातून मांडण्यात आले. संहिता लेखन मिलिंद सबनीस यांचे तर दिग्दर्शन प्रसाद कुलकर्णी यांचे आहे. संगीत अजय पराड यांनी दिले असून अभिषेक खेडकर, अवंती लोहकरे, प्रदीप फाटक यांनी अभिवाचन केले. महेश लिमये आणि सुरेंद्र गोखले यांनी तांत्रिक बाजू सांभाळली.






## जात्यावरच्या ओव्या......

धुतले तांदुळ
जसा चांदीचा चुरा
सुगंधित वरणभात
दरवळे वाडा सारा ||३२६||

मंगलमय अक्षदा
तांदुळ झाले,
आशिर्वाद बनून
डोईवर पडले || ३२७||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

## रामका गुणगान करिये




ज्योतिर्मय साहित्य

कैकयीमुळे आपल्या प्राणप्रिय असलेल्या बंधूला वनात जावे लागते हे लक्ष्मणाला कळते, तेव्हा तो कैकयीची निर्भत्सना करतो. अशा वेळी राम त्याला सुंदर शब्दात समजावतो. लक्ष्मणा, अरे जशी माता कौसल्या, माता सुमित्रा तशीच माता कैकयी. माता ही सदैव आदरणीय असते. जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरियासि हे त्याचे ब्रीद आहे. नाहीतरी मला काही ऋषीमुनींची भेट घ्यायची इच्छा आहे. वनात गेल्यानंतर अनायासे ही इच्छा पूर्ण होईल, असे अत्यंत समजूतदारपणा आणि त्याच्या मनाचे औदार्य दाखवणारे उद्गार तो काढतो.

वनात असतानाही भरत त्याला भेटायला येतो. अयोध्येला परत येण्यासाठी खूप विनवणी करतो. परंतु राम त्याला निर्धारपूर्वक नकार देतो. शेवटचे अस्त्र म्हणून तो वसिष्ठांची पण तशीच इच्छा आहे असे रामाला सांगतो. पण राम भरताला म्हणतो, एकदा आपण वडिलांना जे वचन दिले ते पाळले नाही तर रघुकुलाच्या कीर्तीला कलंक लागेल. रघुकुल रीत सदा चली आई, प्राण जाय पर वचन न जाई . हे ब्रीद कसोशीने पाळणारा राम आहे. या ठिकाणी दुसरा कोणीही असता तर भावाने विनंती केली, वसिष्ठांचीही तशीच इच्छा होती, असे सोयीस्कर उद्गार काढून अयोध्येला परत जाऊ शकला असता.




रामाने एकदा ज्याला आपले म्हटले, हृदयाशी धरले, त्याची साथ कधीच सोडली नाही. मग तो गुहक असेल, निषादराज असेल, सुग्रीव असेल किंवा बिभीषण असेल. शरणागताला आश्रय देणे, प्रसंगी आपल्या प्राणांचे मोल त्यासाठी द्यायला तयार होणे हे रामाचे ब्रीद होते. मित्र जोडताना जातपात, उच्चनीच, स्त्रीपुरुष असा भेद रामाने कधीच केला नाही. रामाने रावणावर विजय मिळवला, लंका जिंकली. ठरवले असते तर तो लंकेचा राजा होऊ शकला होता. पण तो मोह त्याला नव्हता. रावण जर रामाला शरण आला असता, तर रामाने त्याचेही मनपरिवर्तन केले असते. त्याचे राज्य त्याला परत दिले असते. पण तसे व्हायचे नव्हते. कोणी तरी रामाला विचारले, तुम्ही बिभीषणाला राज्य द्यायचे वचन दिले आणि ते त्याला दिले. पण जर रावण तुम्हाला शरण आला असता, आणि त्याने राज्याची मागणी केली असती तर काय ? अशा वेळी रामाने फार सुंदर उत्तर दिले आहे. तो म्हणतो, रावण माझ्याकडे आला असता तर, त्याला मी अयोध्येचे राज्य दिले असते आणि आम्ही चारही भाऊ अरण्यात निघून गेलो असतो. असे मनाचे औदार्य दाखवणारे उदगार फक्त रामच काढू शकतो. रावणाचा वध झाल्यानंतर त्याचा यथोचित अंत्यसंस्कार करावा असे तो बिभीषणाला सुचवतो. मृत्यूनंतर वैर संपते आणि त्याचा आदर्श रामाने घालून दिला.

ामाच्या चरित्रात असे त्याच्या गुणविशेष दर्शवणारे अनेक प्रसंग आहेत. महर्षी वाल्मिकींनी देखील श्रीरामाला देव म्हणून आपल्यासमोर ठेवले नाही. त्याच्या गुणांची पूजा आपण बांधावी, त्याचे अनुकरण करावे हाच त्यांचा उद्देश होता. समर्थ रामदासांनी छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल जे उद्गार काढले आहेत, तेच उद्गार तंतोतंत रामालाही लागू होतात. समर्थ म्हणतात

निश्चयाचा महामेरू, बहुत जनांसी आधारु ।
अखंड स्थितीचा निर्धारु, श्रीमंत योगी ।।

अशा या गुणनिधी असलेल्या रामाचे गुणगान करू या. त्याचे थोडे तरी गुण अंगी बाणवण्याचा प्रयत्न करू या. जय श्रीराम !

***





### दासबोध स्तवन

उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

## ब्रम्हपावननिरूपण

ज्योतिर्मय साहित्य

दशक ६, समास २

नमस्कार,

मनुष्याला ज्या गोष्टीवर प्रेम आहे ती गोष्ट मिळवण्यासाठी त्याने प्रयत्न केले पाहिजेत. तर अध्यात्म क्षेत्रात भगवंताच्या समीप रहायचे आहे तर त्याचे अनुसंधान राखले पाहिजे. त्यासाठी एक ऊदा, देते एका घरात भगवत् गीतेचें ऐवढे अनुसंधान होते की त्या घरातील लहान बालका पासून ते घरातील नव्वदीच्या पूढे असलेले आजीआजोबा सर्वाचा गीतेच्या वचनावर अटळ विश्वास आहे. त्यांच्या घरातले संस्कार गीतावचनावर बांधलेले आहेत. आपोआप पुढच्या पिढीवर रूजवण्यात व रूजवून घेण्यात संपूर्ण कुटुंब बांधील आहे.तर अशा घरात विद्या व लक्ष्मी एकत्र नांदताना दिसतात. म्हणजेच ऊच्चविचारांचे,

नितिमुल्याचे शिक्षण शिक्षण देणे ही तर तुमच्या आमच्याची जबाबदारी आहे. अशा घराण्यातील लोक वाईट गोष्टींना जास्त महत्व देत नाहीत. सतत सत्कर्मानी जीवन सत्कारणी लावतात. आम्हाला भगवंताचे अनुसंधान ठेवायचे आहे. हा एक प्रकारचा अभ्यास आहे.भगवंताचे प्रेम वाढले तर अनुसंधान टिकेल. परिक्षा पास होण्यासाठी जसा अभ्यास करावा लागतो. तसे भगवंताचे प्रेम मिळण्यासाठी ते वाढवण्यासाठी अभ्यास करणे जरूरीचे आहे. यासाठी मी जे जे करेन ते भगवंताच्या साक्षित्वाने करेन अशी खुणगाठ मनाशी बांधून जगणे हे आपले प्रथम कर्तव्य.


मित्रांनो तुम्हाला परमेश्वराच्या सानिध्यात राहुन ब्रम्हविद्या शिकायची आहे तर ब्रम्हांडात शाश्वत काय आहे? अशाश्वत काय आहे। हे प्रथम शिकले पाहिजे. सद्गुरू आपल्याला शाश्वत जे ब्रम्ह त्याचें अनुसंधान कसे ठेवायचे या कलेचा अभ्यास आपल्याकडून करून घेतात. साररूप ब्रम्ह सर्व द्रुश्य सगळ्या जगाला व्यापून टाकते.आपल्याला जे जे सर्व काही दिसते ते ते पंचमहाभूताच्या पासून बनलेले आहे. नाम व रूप सतत बदलत असते. परंतू ब्रम्ह मात्र अचल व अटळ असते. आपला मनुष्यदेह इंद्रियांच्या कक्षेत वावरतो. ऊदा, आज मला श्रीखंडपुरी खायला मिळाली तर ऊद्या मला पंचपक्वाने खावीशी वाटणार. म्हणजे भुक कुठे तरी थांबवावी लागणार. पण हा अज्ञानातून जन्म पावलेला भ्रम आहे. प्रत्येक क्षेत्रात वावरत असताना आपण किती काळ थांबयचे कुठे थांबायचे हे ज्याचे त्याने ठरवायचे असते .त्यासाठी तुम्ही सदगुरू च्या विचारसरणीचा अभ्यास केला पाहिजे. खरे सुक्ष्म, अद्रुष्य, अतिंद्रिय, अविनाशी सद् वस्तु विश्वात व्यापून आहे तीच आत्मरूपाने आपल्या अंतर्यामी वास करत असते. आपलेहे शरीर म्हणजे पंचमहाभूतांचे गाठोडे आहे. विचाराने ते बाजूला सारले. तर स्वस्वरूप शिल्लक रहाते. म्हणून श्री समर्थ सांगतात की, विवेकाने देहबुध्दीचा बंध उकलावा. व्यर्थ वाचाळता करू नये. स्वतःच्या विवेकाने वागावे. स्वरूपानुसंधान ठेवावे म्हणजे दृश्य आपोआप ओसरू लागते व अखेर मोक्ष मिळतो.

प्रथम अध्यात्मश्रवण, नंतर सद्गुरूवचन पालन, मग त्यांच्याप्रती शरणागति आणि शेवटी त्यांच्याच आशिर्वादाने स्वरूपानुभव असा परमार्थ मार्ग आहे. या मार्गाने जाऊन आत्मसाक्षात्कार झाल्यावर हा देह प्रारब्दावर टाकावा व स्वतः चे कल्याण करून घ्यावे. आपले जीवन स्वानंदरसात भिजवून टाकावे.

आपण दासबोधचा अभ्यास करत आहोत यात इतर गोष्टी सांगत बसणें म्हणजे उपदेश नाही. किंवा त्या सांगत बसू नये. तर परमार्थ मार्गात उपदेशम्हणजे ब्रम्हज्ञानाचा मार्ग दाखवणे होय.माणसाने सार सोडून असाराचे सेवन करू नये. कसे ते प्रत्येक ओवीत थोडक्यात पाहूया. संतांचा,देवाचा उपदेश थोडक्यात पाहूया.

पाखडलेल्या धान्याचा भुसा खाता येत नाही.

## सच्चिदानंद परमात्म्याला सगुणाच्या आधारानेच पाहता येईल.



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

परमात्मा सच्चिदानंदस्वरूप आहे हे जरी खरे, तरी ते स्वरूप सगुणाच्या आधाराशिवाय आपल्याला पाहाता येणार नाही. आपण भगवंताला सगुणात पाहावे तेव्हाच त्याच्या विभूतीचे आपल्याला आकलन होईल. म्हणूनच समर्थांनी ‘ निर्गुण ओळखून सगुणात रहावे ’ असे म्हटले आहे. सत्य हे शांत आणि आनंदमय असले पाहिजे; हेच भगवंताचे मूळ स्वरूप आहे. ही सर्व सृष्टी भगवंतानेच उत्पन्न केली असून, तिच्यामध्ये तो व्यापून राहिला आहे; अर्थात, सर्व सृष्टी आनंदमय असली पाहिजे. मी मूळ परमात्मस्वरूप असूनही त्याचा विसर पडल्यामुळे, सृष्टी आनंदमय असूनही ती तशी दिसत नाही; हा भ्रम आहे. डोळ्याच्या आतमध्ये पाहण्याची शक्ती नसेल तर बाह्य डोळा असूनही दिसत नाही; परंतु आंतमध्ये शक्ती असली, तरी ती आहे असे बाह्य डोळ्यांशिवाय कळत नाही. त्याचप्रमाणे सगुण आणि निर्गुण यांचा संबंध आहे. सत्य हे अखंड टिकणारे आहे म्हणून ते शांत आहे; ते शांत आहे, म्हणून सनातन आहे; ते शांत आणि सनातन आहे, म्हणून त्याच्याच ठिकाणी समाधान आहे; कारण अशांतीमध्ये आनंद असणे शक्य नाही. म्हणून सत्य हे परमात्मस्वरूप होय. परमात्मरूपी सत्य हे व्यावहारिक भाषेत सांगितले पाहिजे. पण व्यावहारिक सत्य मात्र निराळे असते. ही सृष्टी भगवंताने निर्माण केली आहे, म्हणून तिच्यामध्ये सर्व ठिकाणी भगवंताचे अस्तित्व असले पाहिजे. याचा अर्थ असा की, प्रत्येकामध्ये भगवंताच्या अस्तित्वाची जाणीव करून देणारा असा एक गुण आहे. हा गुण म्हणजे जगण्याची हौस होय. सर्वांना शांती मिळावी हाच भगवंताचा हेतू आहे. ही शांती परिस्थितीवर अवलंबून नाही. शांती एकपणात आहे, द्वैतात नाही. एकामध्ये ज्याचे मन गुंतले, ज्याने आपले मन भगवंताकडे ठेवले, त्यालाच शांतीचा लाभ होतो; मग त्याची इतर परिस्थिती कशीही असो. प्रपंचाचा अनुभव कष्टमय आहे, पण भगवंताचा अनुभव आनंदमय आहे खास, आणि त्याकरिता त्याच्या नामाचे अनुसंधान हे एकच साधन आहे. भगवंताला पहायचे असेल तर आपल्यालाही तसे व्हावे लागते. सत्त्वगुणात भगवंत असतो; तेव्हा आपण त्या मार्गाने जावे. आजारी माणसाला तीन गोष्टी कराव्या लागतात : कुपथ्य टाळणे, पथ्य सांभाळणे, आणि औषध घेणे. त्याचप्रमाणे भवरोग्यालाही तीन गोष्टी कराव्या लागतात. मुख्य ध्येय परमात्मप्राप्ती. त्याच्या आड जे येईल ते कुपथ्य – दु:संगती, अनाचार, अधर्माचरण, मिथ्या भाषण, द्वेष, मत्सर, वगैरे – त्याचा त्याग करावा; परमात्मप्राप्तीला जे सहाय्यक, पोषक सत्संगती, सद्विचार, सद्ग्रंथवाचन, आणि सदाचार – ते पथ्य; ते सांभाळावे, आणि अखंड नामस्मरण करणे हेच औषधसेवन होय.

आनंदरूप परमात्मा मिळविण्यासाठी सगुणोपासना पाहिजे.

***



## शाळेची मज्जा...

अंकुश शिंगाडे,
नागपूर

### सहावं वरीस धोक्याचं?

ज्योतिर्मय साहित्य

शाळेत जायचंय, वयोमर्यादा सहा. असं नवीन शैक्षणिक धोरण. नवीन शैक्षणिक धोरणाचा नवीन आकृतीबंध. या बंधानुसार शाळेचा पुर्वप्राथमिक स्तर नर्सरी, केजी वन व केजी टू तीन वर्षाचा, त्यानंतर पहिली ते पाचवी प्राथमिक, सहावी ते आठवी उच्च प्राथमिक, आठवी ते बारावी माध्यमिक असा स्तर निर्माण करण्यात आला व त्यानुसार वय वर्ष सहा हे वर्ष पहिल्या वर्गात प्रवेशासाठी निश्चीत करण्यात आलं. आता या बंधानुसार वयाची सहा वर्ष झालेली मुलं पहिलीत जाणार आहे.

पहिल्या वर्गात प्रवेशाबाबत विचार करतांना एक इतिहास सांगणे गरजेचे समजतो. त्यासाठी इथून पंचेचाळीस ते पन्नास वर्ष मागं जावं लागेल. साधारणपणे पन्नास वर्षापूर्वी पहिल्या वर्गात नाव दाखल करतांना मुलांना कानाला हात पुरवावा लागत असे. ज्या मुलांच्या कानाला हात पुरत असे. त्याला पहिल्या वर्गात घेतल्या जात असे आणि ज्यांचा हात कानाला पुरत नसे. त्याचा पहिल्या वर्गात प्रवेश निषिद्ध समजल्या जाई. ती पद्धत आताच्या वय वर्ष सहा सारखीच होती. परंतू त्यात एक दोष होता. तो दोष म्हणजे काही काही मुलांचा कानाला हात सहा वर्ष पुर्ण होताच पुरत असे. काहींचा हात सात आणि आठ वर्ष पुर्ण होत असले तरी पुरत नसे. यावरुन मुलांच्या शिक्षणाचं कानाच्या हात पुरण्यानुसार नुकसान झालं. काहींचं त्या मुलांच्या हुशारीनुसार नुकसान झालं.

जन्मतः काही मुलं हुशार असतात. तो मुलगा जरी वय वर्ष पाचचा असला तरी तर काही मुलं ही वयाची आठ दहा वर्षाची असली तरी ती बुद्धिमान नसतात. कारण प्रत्येकजणांचा मेंदू हा तसा तल्लख नसतो.

सरकारनं हाच विचार निश्चीत करुन पहिल्या वर्गात प्रवेशाबाबत वय वर्ष सहा निर्धारीत केले. कारण या वयात बहूतेक विद्यार्थ्यांचा मेदू पुर्ण वाढ झालेला असतो असं सरकारचं मत. अशा वयात जर त्याचा प्रवेश पहिलीत झाला तर तो पहिल्या वर्गातील ज्ञान पुरेपूर आत्मसात करीत असतो हेही सरकारचंच मत. यामुळं पहिलीसाठी सहा वर्ष पूर्ण निर्धारीत केले गेले आणि त्या वयापुर्वी त्या मुलाला बालवाडीत टाकावे वा नर्सरी केजी वन व केजी टू ला टाकावे असे निश्चीत केले गेले. मुख्य म्हणजे विद्यार्थ्यांना पहिलीत टाकतांना वय वर्ष सहा हे बंधन पाळून जर त्याचा पहिलीत प्रवेश निश्चीत केल्या गेला तरीही विद्यार्थ्यांचं नुकसान होणारच. कारण काही काही मुलांचा मेंदू हा सहा वर्ष पुर्ण करण्यापूर्वीच पुर्ण वाढ झालेला असतो. हे आजही संशोधनातून सिद्ध झालेले आहे. उदाहरण द्यायचं झाल्यास पूर्वीच्या काळातील राजामहाराजांचं देता येईल. असे असतांना मग वय वर्ष सहा हे पहिलीच्या वर्गात प्रवेशासाठी का निर्धारीत केले गेले असावे? हा उपस्थीत झालेला प्रश्न आहे. त्याच कारणाचा विचार करतांना मुख्यतः कॉन्व्हेंटचेच उदाहरण द्यावे लागेल. कॉन्व्हेंटला वय वर्ष सहा होण्यापूर्वी पहिलीत प्रवेश मिळत नाही. त्याचाच विचार करुन सामान्य गरीबांच्या मुलांनाही ते कितीही हुशार असले तरी त्यांचा प्रवेश हा वय वर्ष सहा निश्चीत केल्या गेला व त्या मुलांचं नुकसान केलं गेलं. हा पहिला हेतू सरकारनं साध्य केला. दुसरा हेतू हा साध्य केला, तो म्हणजे कॉन्व्हेंटला मुलं मिळावी. (क्रमशः)




## कॅंल्शियमची कमतरता

ज्योतिर्मय साहित्य

शरीरातील कॅल्शियम हे विटामिन डी. थायराइड ,हार्मोन्स आणि कॅल्सीटोनील याद्वारे नियंत्रित केले जाते. त्यामुळे शरीरातील व रक्ताची कॅल्शियमचे प्रमाण नेहमी योग्य राहते विटामिन डी आतड्यातील व किडनीतील कॅल्शियम रक्तामध्ये शोषून घेण्यासाठी मदत करते. आपल्या शरीराला विटामिन डी ही कोवळ्या सूर्यप्रकाशातून मिळत असते .विटामिन डी च्या कमतरतेमुळे हाडातील कॅल्शियम कमी होऊन हाडे ठिसूळ होतात. याशिवाय आहारातून कॅल्शियम युक्त पदार्थांचे सेवन न करणे, पचनशक्ती मंदावणे यामुळे आहारातील कॅल्शियमची शोषण कमी होते तसेच स्त्रियांना मासिक पाळीत अतिरिक्त स्त्राव होणे, स्त्रियांची मासिक पाळी येणे बंद झाल्यानंतर हार्मोनचे संतुलन बिघडणे व ऊन आणि शारीरिक श्रमांचा अभाव, गोड पदार्थांची अति सेवन करणे ,नवजात बालकांना मातेचे दूध न मिळणे यामुळे देखील कॅल्शियमची कमतरता निर्माण होते .प्रत्येक स्त्रीमध्ये मासिक पाळी बंद झाल्यानंतर शरीरातील हार्मोन्सची संतुलन बिघडल्याने संपूर्ण शरीरातील हाडे ठिसूळ लागतात. या दिवसांमध्ये फक्त आहारातून कॅल्शियम घेऊन पूर्तता शकत नाही त्यासाठी आयुर्वेदिक कॅल्शियमची औषधे घेणे गरजेचे असते अन्यथा स्त्रियांच्या शरीरातील हाडे ठिसूळ होऊन थोडाश्या आघाताने देखील भग्न होऊ शकतात .

अनेक स्त्रियांना हाता पायांना मुंग्या येणे, मणक्याचे विकार उद्धवणे,मान व कंबर दुखणे, सकाळी उठताना त्रास होणे, चालताना त्रास होणे ,मांडी घालून जास्त वेळ बसू न शकणे. शौचाला बसता न येणे ,चक्कर येणे, गुडघेदुखी ,लवकर थकवा येणे ,दात दुखणे, नखे ठिसूळ झाल्याने तुटणे, केस गळणे, सतत भीती वाटणे, ताण तणाव जाणवणे ,स्मरणशक्ती कमी होणे व झोप न लागणे अशा अनेक प्रकारच्या त्रासांना तोंड द्यावे लागते तथापि बहुतांश स्त्रियां त्याकडे दुर्लक्ष करतात त्यामुळे त्याचे दुष्परिणाम भोगावे लागतात .

स्त्रियांनी वयाच्या पन्नाशीनंतर आहारात कॅल्शियम पदार्थांचे प्रमाण वाढवावे.त्यासाठी कॅंल्शियम युक्त आहाराचे सेवन करावे.पुढील पदार्थ हे कॅंल्शियमयुक्त असतात. त्यांचा आहारात समावेश करावा.

गहू, बाजरी ,नाचणी, दूध व दुधाचे सर्व पदार्थ, मुगडाळ ,सोयाबीन, वाटाणे, मटकी, राजमा, कढीपत्ता, कोबी, मेथी, मुळ्याची पाने, पुदिना, कोथिंबीर ,काकडी, गवार ,टोमॅटो, मनुका, बदाम, पिस्ते, अक्रोड, खरबुजाच्या बिया, नारळ, आंबा, सिताफळ, संत्रा ,अननस ,ओवा ,जिरे, हिंग, लवंग, व काळे मिरे या पदार्थांचा आहारात समावेश असावा.

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

कॅंल्शियम वाढण्यासाठी घरगुती उपाय

सकाळी एक ग्लास ताज्या ऊसाच्या रसामध्ये एक गुंज चुना टाकून प्यावा.

जेवणानंतर नागवेलीचे ( खायचे )पान व चुना खावा.

रात्री झोपण्यापूर्वी ऊक ग्लास दूधात गूळ टाकून प्यावा.

सुरमई माशाचे सेवन करावे.

बदाम ,सुके अंजीराचे सेवन करावे.

आहारात भेंडीच्या भाजीचे सेवन जास्त करावे.

स्वयंपाकात तीळ तेलाचा वापर करावा.

रोज आवळ्याचे सेवन करावे

एक ग्लास पाण्यात एक चमचा जिरे टाकून उकळून घ्यावे व थंड झाल्यावर सकाळी व सायंकाळी प्यावे.

बाभळीच्या बियांचे सूक्ष्म चूर्ण तूप व मधासोबत घ्यावे.

बाभळीच्या डिंकाचे चूर्ण तूप साखरेसोबत घ्यावे.

एक कप दूधात एक चमचा बडिसोप टाकून दूध उकळुन घेऊन त्यामध्ये एक चमचा बाभळीच्या डिंकाचे चूर्ण टाकून ढवळून थंड झाल्यावर घ्यावे.

वयाच्या पन्नाशी नंतर स्त्रियांना तसेच पुरुषांना देखील कॅंल्शियम ची कमतरता असतेच. तथापि त्याकडे दुर्लक्ष करणे खूपच नुकसान दायक ठरू शकते. तेव्हा पन्नाशी नंतर प्रत्येक व्यक्ती ने त्यासाठी आयुर्वेद तज्ञांच्या सल्ल्याने औषधोपचार घेतल्यास व्रुध्दत्व सुखकर होते हे नक्कीच.



## राक्षसभूवन

### वरदसुत-दत्तस्थान

योगिराज डोळे
राक्षसभुवनकर
संपर्क 9420224999

ज्योतिर्मय साहित्य

याच स्थानावर दत्तभक्त दासोपंतांना प्रत्यक्ष दत्तदर्शन झाले. त्यांना स्वत:च्या चरण पादुका दत्तमहाराजांनी दिल्या तेच हे पवित्र स्थान असल्याचा उल्लेख आहे. येथील मंदिरातील वरद दत्तमूर्ती एकमुखी असून, अतिशय दुर्मिळ आहे. ही मूर्ती वालुकामय, षड्भुजा आहे. मूर्ती अत्यंत खोल गाभाऱ्यात असून हे भारतातील असे एकमेव स्थान आहे, ज्या ठिकाणी दत्त यंत्र आहे. बीडच्या राष्ट्रीय महामार्ग २११ पासून हे स्थान फक्त ११ किलोमीटर अंतरावर आहे.

‘सती अनसूयेच्या सतित्वाची परीक्षा पहाण्यासाठी ब्रह्मा, विष्णु आणि महेश भूतलावर आले अन् तिच्या तपोबळामुळे त्यांचे अवतरण तीन छोट्या बालकांत झाले. त्यामधे श्रीविष्णूचे अवतरण ज्या बालकात झाले, ते म्हणजे श्रीगुरु दत्तात्रेय

ही घटना ज्या ठिकाणी घडली, ते ठिकाण आहे ‘‘श्रीक्षेत्र रक्षोभुवन‘‘ महाराष्ट्रातील बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्यात गोदावरी नदीच्या दक्षिण तिरावर वसलेले एक पवित्र दत्तपीठ! कालांतराने या तीर्थक्षेत्राचे नाव श्री राक्षसभुवन असे झाले.

श्री राक्षसभुवन येथील स्थानाला आद्य दत्तपीठ असे का म्हणतात ?

श्री दत्तगुरूंची अन्य पिठे, उदा. कारंजा, माणगाव, नृसिंहवाडी इत्यादी ठिकाणे म्हणजे मानवी देहावतारी दत्तपिठे आहेत. ही पिठे श्री दत्तात्रेयाच्या त्या त्या अवताराच्या नावाने प्रसिद्ध आहेत; मात्र राक्षसभुवन येथे प्रत्यक्ष दत्त जन्माला आले. त्यामुळे ते तत्त्वरूपी दत्तपीठ आहे. त्यामुळेच या स्थानाला आद्य दत्तपीठ’ असेही म्हणतात. येथे ब्रह्मा, विष्णु आणि महेश यांनी माता अनसूयेला वर दिला असल्याने हे वरद दत्तात्रेय मंदिर’ म्हणून प्रसिद्ध आहे. हे निर्गुण पीठ असल्याने या मंदिराला कळस नाही. (क्रमशः)

# ‘‘सुन्या सुन्या मैफिलीत माझ्या’’

**ज्योतिर्मय साहित्य**

उंबरठा चित्रपटातलं सुरेश भटांचं ‘‘सुन्या सुन्या मैफिलीत माझ्या‘‘ हे गीत म्हणजे विरह, आठवण आणि प्रेमाच्या गूढ अनुभूतीचं अप्रतिम कलात्मक चित्रण आहे.



सुलभा म्हणजे पडद्यावरील स्मिता पाटील एकाकी मनाच्या जगात प्रिय व्यक्तीच्या आठवणींची गाणी गाताना दिसतेय.

सुलभा सुभाषपासून शरीराने दूर असली, तरीही तिच्या मनात ‘‘अजुनही चांद रात आहे’’ म्हणजेच प्रेमाची चांदण्यासारखी भावना अजूनही शाबूत आहे.

‘‘सुन्या सुन्या मैफिलीत माझ्या’’

या ओळींमध्ये विरहातील स्मरणरंजन आहे. एकांत असूनही ती प्रेमगीत गातेय . दुरावलेलं प्रेमही प्रेरणा बनलेय तिच्यासाठी

‘‘अजुनही चांद रात आहे’’

म्हणजेच प्रेमाच्या आठवणींनी तिचं आयुष्य अजून उजळलेलं आहे.

‘‘कळे न मी पाहते कुणाला’’

ही ओळ अवचेतनातील आठवणींचं (असं म्हणायचं असावं कदाचित) द्योतक आहे. ती स्वतःचं मन समजून घेतेय . कोणाला पाहतेय हेही कळत नाही, पण प्रत्येक आरशात, प्रत्येक चेहऱ्यात तिला तोच दिसतोय.

‘‘तुझे हसू आरशात आहे’’ ही प्रतिमा मनोहर आहे . जणू तिचं अस्तित्व त्याच्या सभोवती विराजमान आहे.

. ‘‘सख्या तुला भेटतील माझे’’

ही ओळ अद्वैताचं दर्शन घडवते.

तिला वाटतं, आपला सूर, आपला स्वर म्हणजेच आपल्या भावनांचा गंध त्याच्या आसपास अजूनही आहे.

‘‘अबोल पारिजात’’ हे अप्रतिम रूपक आहे .

शेवटच्या कडव्यात विरहाचं वर्णन आलंय .

ती त्याला विचारतेय तू स्वप्नांत का आलायैस? कोणाच्या प्रेमात आहेस तू आता? पण त्याचवेळी जाणवते ‘‘तुझ्याच जे अंतरात आहे’’, म्हणजेच ते प्रेम तिच्याच मनात अजूनही आहे.

या गीतात शृंगार रस, विरह रस आहे.

त्याचबरोबर करुण रसही जाणवतो.

‘‘सुन्या सुन्या मैफिल’’, ‘‘आरशात हसू’’, ‘‘अबोल पारिजात’’ या प्रतिमा सौंदर्य आणि वेदना दोन्हींचं अद्भुत संतुलन साधतात.



सविता कारंजकर
(मो)९९२२८१४१८३

रूपक आणि प्रतिमांचा सुयोग्य वापर (मैफिल, आरसा, पारिजात, चांद रात)

हृदयनाथ मंगेशकरांचं संवेदनशील संगीत, शब्दांत लय आहे, जणू हे गीत ओठांवरच आहे आणि सदैव गुणगुणावं.

‘‘सुन्या सुन्या मैफिलीत माझ्या’’ हे गीत म्हणजे भटांच्या काव्यातील ही एक अशी रचना आहे जिथे वेदना हेच सौंदर्य आहे आणि एकांतही संगीत होऊन उमलतो. लता मंगेशकर यांनी गायलेलं हे गीत प्रत्येक वेळी ऐकताना हृदयाचा ठाव घेतं.

दु:ख, विरह, निराशा, अपयश कोणतीही भावावस्था असताना हे गाणं ऐकलं की वाटतं, ‘‘ जीवन सुंदर आहे‘‘

एवढे संवादी सूर, शब्द आता पुन्हा होतील की नाही माहिती नाही. तो काळ आणि ती माणसं सगळंच कमाल होतं, जादुई दुनिया.

आपण आनंद घेत रहायचं.

***



# वल्लभभाई पटेल जयंती आणि इंदिरा गांधी यांची पुण्यतिथी साजरी

**ज्योतिर्मय साहित्य**

**छत्रपती संभाजीनगर** – नारायणराव उजळंबकर सार्वजनिक वाचनालय एन चार सिडको येथे ३१ ऑक्टोबर रोजी सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती आणि श्रीमती इंदिरा गांधी यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली.या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून श्री रामरूले तर अध्यक्ष म्हणून डॉ वि ल धारूरकर उपस्थित होते.प्रारंभी पाहुण्यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्या नंतर वाचनालयातर्फे पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले.या वेळी प्रमुख पाहुणे श्री रामरूले यांनी आपले विचार व्यक्त केले तर अध्यक्ष डॉ वि ल धारूरकर यांनी श्रीमंती इंदिरा गांधी यांनी पाकिस्तान विरुद्ध तीन वेळा विजय मिळवून दिला तर जागतिक स्तरावर भारताची प्रतिमा उज्वल होण्यासाठी प्रयत्न केल्याचे सांगितले.या कार्यक्रमाला डॉ धनवाले, डॉ. श्यामसुंदर कुडे, शरद डबीर, अश्विनी खुल्लर, जगत यांच्यासह असंख्य वाचक, सदस्या, नागरिक उपस्थित होते. शेवटी उदय सुरांगुळीकर यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विजय जोग यांनी केले.

# आदिवासी विद्यार्थी मुख्य प्रवाहात येण्यासाठी दिलीप घुमरे यांचे विशेष व्याख्यान

**ज्योतिर्मय साहित्य**

**ओतूर** – सत्यशोधक भाऊ कोंडाजी डुंबरे पाटील प्रतिष्ठान व शिवनेरीचे शिलेदार या व्हाट्सअप समूहाच्या वतीने किशोरवयीन आदिवासी विद्यार्थिनींना मासिक पाळी जनजागृतीसाठी सचिन आशा सुभाष यांच्या ‘‘प- पाळीचा‘‘ पुस्तिकेचे मोफत वाटप रविवार दिनांक १६ नोव्हेंबर २०२५ रोजी आदिवासी आश्रम शाळा कोळवाडी येथे होणार आहे.

संगमनेरचे जिल्हा न्यायाधीश दिलीप घुमरे यांच्या शुभहस्ते या पुस्तिकेचे मोफत वितरण तसेच तज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जुन्नरचे माजी आमदार बाळासाहेब दांगट असणार आहेत अशी माहिती प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष नंदूशेठ भोर व कार्याध्यक्ष नरेंद्र ज.डुंबरे यांनी दिली. आदिवासी विद्यार्थी मुख्य प्रवाहात येण्यासाठी दिलीप घुमरे यांचे विशेष व्याख्यान यावेळी होणार आहे.

नोव्हेंबरच्या शेवटच्या आठवड्यात तालुक्यातील विद्यार्थ्यांना व नागरीकांना ऐतिहासिक वारसा स्थळे व गड किल्ल्याची माहिती व्हावी म्हणून दुर्ग भ्रमण मोहीम सत्यशोधक प्रतिष्ठान तसेच शिवनेरीचे शिलेदार समूहाचे जालिंदर उकिर्डे,विकास तांबे,संजय तांबे यांच्या नेतृत्वाखाली आयोजित करण्यात आली आहे.या प्रसंगी तज्ञांकडून वारसा स्थळांची सखोल माहिती देण्यात येणार आहे.

सहभागी होण्यासाठी इच्छुकांनी नंदूशेठ भोर (९८ २२ ४९ ७७ ११) यांच्याकडे नाव नोंदणी करण्याचे आवाहन प्रतिष्ठानचे अध्यक्ष सुधाकर डुंबरे यांनी केले आहे.

# आमचा राजेशाही!शहेनशहा दहीवाला

**ज्योतिर्मय साहित्य**

गोष्ट सन १९६९ते १९७५ या सालातील आहे. त्यावेळेस आम्ही उदगीर, तेव्हाचा जिल्हा उस्मानाबाद आताचा धाराशिव येथे राहात होतो. आम्ही जिथे राहात होतो ते घर म्हणजे निजामाच्या काळातील मोठा वाडा होता. तो हळीखेडे नावाच्या आमच्या घरमालकाने विकत घेतलेला होता. खाली भलेमोठे विस्तृत अंगण होते. त्याला लागूनच शेजारी एक दहा बाय पंधराची ओसरी होती.त्या ओसरीला चिटकूनच उजव्या व डाव्या बाजूला एक एक खोली होती.तसेच,पहिल्या मजल्यावर एक भव्य दिवाणखान्यासारखा हॉल होता आणि त्याला लागूनच एक छोटी खोली होती. जिन्याने वरच्या मजल्यावर जाण्यासाठी मोठ्या दगडांच्या पाय-यांचा जिना केलेला होता. एवढ्या मोठया घराला दरमहा त्याकाळात वीस रुपये एवढे घरभाडे होते. त्या वाड्याच्या बाहेर पाच बाय सहा आकाराचे पांढ-या शाहाबादी फरशांचे दोन मोठे ओटे होते. त्या ओट्यांसमोरंच वाहतूकीचा मोठा रस्ता होता. रोज सकाळी आठ-साडेआठ वाजता आमचे दहिवाले काका त्याच रस्त्यावरुन मोठ्या आवाजात दहीया दहीघ्या असं म्हणत खास त्यांच्या ठेवणीतल्या आवाजात आवाज देत फिरत असत. त्यांच्या डोक्यावर भलंमोठं जर्मनचं भांडं ठेवलेलं असायचं त्यात पंचवीस तीस लिटर बसेल एवढं दही असायचं.

सकाळी सात वाजल्यापासून ते दूपारी एक वाजेपर्यंत दहीवालेकाका संपुर्ण दही विकायचे. त्यांचा पेहराव आणि त्याचं जगणंही एखाद्या राजासारखं, शहेनशहा सारखं होतं. गरीबीतही ते त्याच रुबाबात राहातं होते. प्राप्त जीवन जगत होते. गरिबीचा लवलेशही त्यांच्या चेहऱ्यावर कधीही दिसत नसे. त्यांचा चेहराही रुबाबदार भव्य होता. भव्य कपाळ! त्यावर अष्टगंधाचा टिळा लावलेला असे. दहीवाल्या काकांचं वय पंचावन्न ते साठ वर्षं असावं. थोड्याशा काळ्या व पांढ-या अशा जाड पण पिळदार अशा त्यांच्या शेवटी पीळ घातलेल्या मिशा होत्या. त्यांच्या अंगावर रेशमी लाल, गुलाबी काठाचे छान नि-या केलेले काठेवाडी पध्दतीने नेसलेले धोतर असायचे. त्यांच्या अंगात कधी गुलाबी तर कधी लाल रंगाचा रेशमी कुडता घातलेला असायचा. तसेच, डोक्यावर छान रुबाबदार असा तूरा असलेला कधी गुलाबी तर कधी लाल अशा रंगाचा आकर्षक पध्दतीने बांधलेला फ ेटा असायचा. त्यामुळे, या पेहरावातही दहीवालेकाका एखाद्या राजासारखे, शहेनशहासारखे रुबाबदार दिसत असत. तसेच, त्यांचं पध्दतीने रस्त्याने चालत चालत ते दहीया, दहीघ्या अशी खास ठेवणीतले आरोळी ठोकत फिरत असत. तो त्यांचा आवाज ऐकून मग मी आईकडून दह्याचं भांडं व पैसे घेवून मुख्य दरवाजाच्या ओट्यावर जात असे. त्यावेळेस मी तिसरी चौथीत होतो. त्या दहीवालेकाका काकांना मी आवाज देवून बोलावीत असे. ते काका ओट्यावर दह्याचं भांडं टेकवून त्यावरचं झाकण काढीत असत.

तेव्हा त्यातील दही पाहून मला खूप आनंद होत असे. कारण ते दही खूप घट्टबंड्या म्हणजेंच खूप घट्ट असे. त्या दह्यात ते त्यांचा मोठा लांब असा चमचा घालित असत, तो चमचा घातला की, त्या दह्याची जाड घट्ट वडी पडत असे. तो चमचा ते पावशेर दही मापात घालून पुर्ण माप भरुन दही




लेख व काव्यरचना
मधुकर निलेगावकर, पुणे
९४२१३७५६९१


माझ्या पातेल्यात ओतीत असत. वर धार म्हणून फूकट अर्धा चमचा दही ते काका देत असत.सत. कधी पावशेर,तर कधी दोन पावशेर दही आम्ही घेत असू. आजच्या काळाचा विचार केला तर ते दही तेव्हाचा एक

चमचा म्हणजे अर्धा लिटर व दोन चमचे म्हणजे एक लिटर दही होईल. इतकं घसघशीत माप त्यावेळेसचं होतं. तसंच,ते दही सुध्दा चवीला स्वादिष्ट,गोड अमृतमय असं लागत असे. कधी कधी आम्हाला भावांना ते दहीवालेकाका आमच्या हाताच्या ओंजळीत ओंजळ भरुन फूकट दही देत असत. असे ते मनमोकळ्या स्वभावाचे, निस्पृह,निगर्वी दहीवालेकाका होते.

त्या काळातील बहुतेक माणसे अशीच मनमोकळ्या स्वभावाची, निस्पृह, निगर्वी, निस्वार्थी अशा स्वभावाची होती. मग, ते भाजीवाले, फळवाले, दूधदहीवाले किराणा, स्टेशनरी,कापड दूकानदार आशा विविध क्षेत्रातील माणसे असतील. अशी ती माणूस म्हणून जगणारी आणि माणूसपण जपणारी माणसे होती. त्यांना मनापासून, हृदयापासून सलाम! नम्र प्रणाम!








# नतमस्तक या मराठी चित्रपटाची पोस्टर लाँचद्वारे घोषणा....

**ज्योतिर्मय साहित्य**

नवनवीन विषयांवरील प्रयोगशील चित्रपटांची थोर परंपरा लाभलेल्या मराठी सिनेसृष्टीत आणखी एका अनोख्या विषयावर आधारलेला चित्रपट बनविण्यात येत आहे. समाजाभिमुख चित्रपटांना नेहमीच प्रेक्षकांचा कौल मिळाला आहे. त्यामुळेच समाजाला आरसा दाखविणाऱ्या चित्रपटांची निर्मिती होत असते. नुकतीच घोषणा करण्यात आलेला नतमस्तक हा मराठी चित्रपट याच वाटेवरील पुढचे पाऊल आहे. या चित्रपटात नेमके काय पाहायला मिळेल याची उत्सुकता वाढविण्याचे काम पोस्टर करीत आहे.




निर्माते रमेश वामनराव शिंदे यांनी आर. एस. गोल्डन ग्रुप मुव्ही मेकर्सच्या बॅनरखाली नतमस्तक चित्रपटाची निर्मिती केली आहे. रमेश शिंदे यांची ही पहिलीच चित्रपट निर्मिती आहे. रमेश शिंदे हे पुण्यातील यशस्वी उद्योजक असून सामाजिक कार्यात अग्रेसर असतात. आजवर वेगवेगळ्या विषयांवर लघुपट तसेच चित्रपट बनवत राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पातळीवरील पुरस्कारांना गवसणी घालणारे दिग्दर्शक महेश रावसाहेब काळे नतमस्तकचे दिग्दर्शन करीत आहेत. दिग्दर्शक महेश काळे यांच्याबाबत सांगायचे तर त्यांनी दिग्दर्शित केलेल्या रुपया या लघुपटाने राष्ट्रीय पुरस्कारावर मोहोर उमटवली आहे. याखेरीज त्यांच्या घुमा चित्रपटाने महाराष्ट्र राज्य सरकारचा पुरस्कार पटकावला आहे. ललित प्रभाकर अभिनीत टर्री या टेररबाज मराठी चित्रपटानंतर महेश काळे यांचा नतमस्तक हा एका वेगळ्या विषयावरील चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

पहिले वहिले पोस्टर लाँच करून नतमस्तक चित्रपटाची घोषणा करण्यात आली आहे. पोस्टरवर दुष्काळग्रस्त भागातील भेगाळलेल्या शेतात असलेल्या एका विहिरीत पेटलेली आग पाहायला मिळते. एक तरुणी त्या विहिरीच्या दिशेने जात असून, बाजूला एक गाय उभी असल्याचे पोस्टरवर पाहायला मिळते. पोस्टरवरील चित्र महाराष्ट्रातील भीषण वास्तवाचे दर्शन घडविणारे आहे. हा चित्रपट पुढल्या वर्षी संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार आहे.

नतमस्तकबाबत दिग्दर्शक महेश काळे म्हणाले की, चित्रपटाचे पोस्टर खऱ्या अर्थाने उत्सुकता वाढविणारे आहे. पोस्टरवर दाखविण्यात आलेले चित्र काल्पनिक नसून, भयाण सत्य कथन करणारे आहे. चित्रपटाच्या कथानकाबाबतची माहिती सध्या गुलदस्त्यात ठेवण्यात आली असली तरी लवकरच ती रिव्हील करण्यात येणार आहे. त्यासोबतच कलाकारांच्या नावांची घोषणाही करण्यात येईल. हा केवळ मनोरंजनपर चित्रपट नसून, सामाजिक प्रबोधन करत समाजाला नवी दिशा देण्याचा हा एक प्रयत्न आहे. निर्माते रमेश शिंदे यांना चित्रपटाचा विषय आवडल्याने नतमस्तकसारखा चित्रपट बनवणे शक्य झाल्याचेही काळे यांनी सांगितले.

नतमस्तक हा चित्रपट सामाजिक विषयावर आधारलेला आहे. समाजसेवक असल्याने निर्माते रमेश शिंदे यांना नतमस्तकचा विषय आणि आशय भावला आणि त्यांनी निर्मितीची धुरा सांभाळली. महिला सबलीकरण, व्यवसाय जागृती, तरुणांना उद्योग चालना, गोशालेच्या माध्यमातून प्राणी मुक्ती-दया उपक्रम, अनाथ मुलांना मदत, शालेय शिक्षणासाठी हातभार लावण्याचे काम करतात. उद्योग क्षेत्रात वाटचाल करत असताना आजूबाजूची परिस्थिती पाहता समाजसेवेत अग्रेसर झालेल्या रमेश शिंदे यांनी आपणही समाजाचे काही देणे लागतो या भावनेतून नतमस्तक होत हा चित्रपट करण्याची भावना व्यक्त केली.

***

# संघ स्पर्श करण्याचा माझ्या जीवनातील पहिला अनुभव – प्रारंभिक वर्ग

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

संघ स्पर्श करण्याचा माझ्या जीवनातला सगळ्यात पहिला अनुभव म्हणजे प्रारंभिक वर्ग.

हा फक्त एक वर्ग नव्हता, तर संघ समजण्याचा माझा पहिला अनुभव होता. मी जेव्हा संघासोबत जोडला गेलो, तेव्हा मनात खूप संकोच आणि तितकेच प्रश्न होते. तरीही, काहीतरी नवीन जाणून घेण्याच्या इच्छेने मी वर्गासाठी नाव नोंदवले आणि तो पूर्ण केला.

वर्ग सुरू झाला २४ ऑक्टोबर संध्याकाळी ६ वाजता सवंगी, चिकलठाणा जिल्हा, देवगिरी प्रांत येथे. नोंदणी झाल्यानंतर आम्हाला वयानुसार गटांमध्ये विभागले गेले. या वर्गात एकूण ११० विद्यार्थी गण सहभागी झाले होते. माझ्यासोबत माझा कोणीच मित्र नव्हता, म्हणून मनात थोडी भीती आणि संकोच होता, पुढे काय होईल याची उत्सुकता आणि धाक दोन्ही होते. पण जसजसे वर्गाचे अंतिम दिवस जवळ येत गेले, तसतसं वाटू लागलं की हा वर्ग कधी संपूच नये. कारण फक्त दोन दिवसांतच इतके मित्र आणि मित्रांसारखे शिक्षक मिळाले की हा वर्ग एक गुरुकुल वाटायला लागला होता.

प्रारंभिक वर्ग हा संघ समजून घेण्याचा पहिला टप्पा आहे. आमच्या दिवसाची सुरुवात पहाटे ४:३० वाजता शिक्षकाच्या शिट्टीसोबत होत असे. त्यानंतर सर्व स्वयंसेवक एकत्र जमून दिवसाची पवित्र सुरुवात एकात्मता स्तोत्र व मंत्रोच्चारांनी करीत असत.

यानंतर आम्ही संघस्थानी निघायचो. तिथं गटानुसार योग व शारीरिक प्रशिक्षण घेतले जात असे. संघ आपल्याला केवळ शारीरिक नाही तर मानसिक आणि चारित्रिक बळही देतो. आम्ही दंडयुद्ध, नियुध, प्रहार, पदविडण्यास अशा अनेक विद्यांचा परिचय घेतला.

संघ आपल्याला शिस्त, शास्त्र आणि शस्त्र  या तिन्ही गोष्टींचे संतुलन शिकवतो.

संघस्थानी आल्यानंतर आम्ही सर्वजण नाश्त्यासाठी एकत्र बसायचो. आमच्यासोबत शिक्षकसुद्धा असायचे. आमच्या वर्गात शिक्षकांचे महत्त्व खूप मोठं होतं. त्यांनी आपले विचार आमच्यासमोर मांडले आणि आमचे विचारही मनपूर्वक ऐकले. ते फक्त शिक्षक नव्हते, तर आमचे मार्गदर्शक आणि मित्र होते.

नाश्ता आणि स्नानानंतर आम्ही बौद्धिक वर्गासाठी आपल्या आपल्या कक्षाकडे निघायचो. वेगवेगळ्या दिवसांत विविध विषयांवर चर्चा होत असे. त्या पैकी काही विषय मला विशेष लक्षात राहिले.

पहिला विषय होता हिंदू संस्कृती.

हिंदू धर्म आणि संस्कृती इतकी प्राचीन आहे की तिचा उगम कधी आणि कुठे झाला हे सांगणं कठीण आहे. हिंदू संस्कृती आपल्याला अनेक मूल्यांची शिकवण देते, कुटुंबप्रबोधन, नागरिक कर्तव्य, आणि राष्ट्रनिष्ठा यांसारख्या विषयांवर आपले ज्ञान विस्तारते.



दुसरा विषय होता भगवा ध्वज.

१९२५ मध्ये डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांनी संघाची स्थापना केली आणि भगवा ध्वजाला आपला गुरु मानले. भगवा ध्वज हा केवळ कापडाचा तुकडा नाही, तो हिंदू संघटनासाठी लढलेल्या प्रत्येक वीराच्या शौर्याचा आणि त्यागाचा प्रतीक आहे.

भगवा ध्वज पाहिला की श्रीकृष्ण, प्रभू राम, महाराणा प्रताप आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या तेजस्वी कार्यांची आठवण होते.

तिसरा आणि सगळ्यात महत्त्वाचा विषय होता संघ स्थापना कशी झाली.

१९२५ साली डॉ. हेडगेवार यांनी १७ स्वयंसेवकांसह भगवा ध्वजास साक्षी मानून हिंदू संघटन आणि राष्ट्रीय सेवेची शपथ घेतली. त्या काळात त्यांचं प्रमुख ध्येय होतं भारतमातेला इंग्रजांच्या जोखडातून मुक्त करणं.



✍ अभिषेक होळंबे, छत्रपती संभाजीनगर

आता पण काही लोकांमध्ये ही शंका असते की संघ ने स्वातंत्र्याच्या लढाई मध्ये सहभाग घेतला होता का? तर त्यांच्या साठी हे एक प्रतिउत्तर राहील.

१९४७ नंतर मात्र संघाचं ध्येय बदललं, आता उद्दिष्ट होतं भारतातील समाजरचना मजबूत करणे आणि राष्ट्रासाठी चारित्र्यवान नागरिक तयार करणे.

डॉ. हेडगेवार काँग्रेसमध्ये होते, परंतु त्यांनी ती सोडून स्वतंत्र संघटन सुरू केली. एक कारण अस होत की काँग्रेस मध्ये फक्त एका माणसाच्या शब्दाला जोर दिला जात होता, जर ते जेल मध्ये किंवा कुठ गेले तर बहुतांश चळवळ थांबून जायची म्हणून डॉक्टरांना हे मान्य नव्हत, कारण कोणत्याही चळवळीत देश पाहिले व कोणताही माणूस नंतर असतो.

१९४० मध्ये हेडगेवारजींच्या निधनानंतर दुसरे सरसंघचालक म्हणून सदाशिव माधवराव गोळवलकर (गुरुजी) यांची नियुक्ती झाली.

जिज्ञासा सत्र  प्रश्न आणि उत्तरे

प्रारंभिक वर्गामध्ये अनेक छान विषयांवर चर्चा झाली. सगळ्यात आश्चर्याची गोष्ट म्हणजे हे फक्त संघाचा एक स्पर्श होता.

आमचा बहुतांश वेळ संघस्थानी दंडयुद्ध आणि बौद्धिक वर्गात छत्रपती शिवाजी महाराजांच्या कथा ऐकण्यात जायचा.

पण या सगळ्यात मला सगळ्यात आवडलेला भाग म्हणजे ''जिज्ञासा सत्र''

आम्हा विद्यार्थ्यांना सांगण्यात आलं की, ''संघाबद्दल तुम्हाला जे काही प्रश्न आहेत, ते एका चिठ्ठीवर लिहा आणि द्या. त्या प्रश्नांची उत्तरं तुम्हाला वर्गाच्या अंतिम दिवशी मिळतील.''

मला हा उपक्रम खूप आवडला कारण माझ्या मनात संघाबद्दल असंख्य प्रश्न होते जे एका पानावर मावणारच नव्हते. तरीही मी शक्य तितके प्रश्न लिहून दिले.

त्या रात्री संघातून एक वरिष्ठ अधिकारी आले आणि त्यांनी एकेक करून आमच्या प्रश्नांची उत्तरे देण्यास सुरुवात केली. प्रश्न विचारणारे बहुतांश तरुण वयोगटातील होते.

संघाची निधी कुठून येते, प्रचारकांची भूमिका काय असते, अशा अनेक विषयांवर आम्ही प्रश्न विचारले.

माझा पहिला प्रश्न होता  ''संघ आपले स्वयंसेवक संघटन मंत्री म्हणून इतर राजकीय पक्षांना का देतो?''

त्यांनी हसत उत्तर दिलं, ''ते मागतात म्हणून आम्ही देतो.'' हे उत्तर ऐकून सगळेच खळखळून हसू लागले.

दुसरा प्रश्न मी विचारला  ''संघ देशहितासाठी काम करत असताना काही लोकांना संघाबद्दल इतका द्वेष का?''

त्यावर त्यांनी शांतपणे उत्तर दिलं, ''बहुतांश द्वेष हा काही राजकीय दलांकडून निर्माण होतो. पण सगळे लोक आपलेच आहेत. आज ते विरोधात आहेत, उद्या ते आपल्यासोबत असतील.''

अशा प्रकारे त्यांनी आमच्या सर्व प्रश्नांची अत्यंत समाधानकारक उत्तरे दिली.

माझा सगळ्यात महत्त्वाचा आणि वारंवार मनात उमटणारा प्रश्न होता ''संघ नेमका काय आहे? त्याची परिभाषा काय? आणि संघाला नेमकं कसं समजून घ्यायचं?''

पण हा प्रश्न विचारायची वेळच आली नाही, कारण वर्गाच्या अंतिम दिवसा पर्यंत त्याचं उत्तर मला मिळालं होतं.

मी ते माझ्या मनोगतात व्यक्तही केलं,

''संघाला न समजता येत, न सांगता येत, संघ फक्त अनुभवता येतो.''

ज्यांना संघ काय आहे हे जाणून घ्यायची इच्छा असेल, त्यांनी संघाच्या शाखेत जाऊन संघाचा अनुभव घ्यावा.

प्रारंभिक वर्गाचे हे दोन दिवस माझ्या मनात कायमचे घर करून राहतील.

# धार्मिक, अध्यात्मिक, वैज्ञानिक, महत्त्व असलेली पापनाशिनी तुळस

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

हिंदू धर्मात तुळशीला पापनाशिनी म्हणून अनन्यसाधारण महत्व आहे. भारतातील बहुतेक सर्वच भागात येणारी, उगवणारी वनस्पती आहे. बहुतेक हिंदू कुटुंबियात घरासमोर तुळस असते.तुळशी वृंदावन असते.

कार्तिक शुध्द एकादशी पासून ते कार्तिक पौर्णिमा पर्यंत तुळशी विवाह करण्याचा प्रघात आहे.कार्तिक शुध्द एकादशी ते पौर्णिमा असे पाच दिवस ही दिवाळी असते.ह्या प्रबोधिनी एकादशीला श्रीविष्णू झोपेतून जागे होतात,आणि चातुर्मास संपतो.सांगता होते.

तुळशी विवाह म्हणजे तुळस ह्या पवित्र वनस्पतींचे रोपावर शालिग्राम किंवा विष्णू किंवा त्याचाच अवतार श्रीकृष्ण याच्याशी विवाह करण्याची प्रथा आहे.

देवांचे जलंदर दैत्याशी युध्द सुरु होते.त्याची वृंदा नावाची पत्नी पतिव्रता होती.तिच्या पातिव्रत्याच्या प्रभावामुळे मुळे देवा कडून त्याचा वध होत नव्हता. श्रीविष्णूने जलंधराचे रुप घेऊन, तिच्या पातिव्रत्याचा भंग केला.तिच्या पातिव्रत्यावर प्रसन्न  होऊन श्रीविष्णूने तिला वर दिला. ''वृंदा, तू तुळस होऊन सगळ्यांना वंदनीय होशील. तुझ्या तुलसीपत्राने भक्त माझी पूजा करतील. तसेच प्रत्येक कार्तिक मासात तुझा विवाह माझ्याशी लावण्यात येईल.''

भगवान विष्णूला तुळस खूप प्रिय आहे.तिला विष्णूप्रियाही म्हणतात. तुळस ही लक्ष्मीचे रुप मानली जाते.तुलसी विवाह हे एक व्रत मानले गेले आहे.हे व्रत केल्याने कन्यादानाचे फळ मिळते असेही मानले जाते.हे एक काम्य व्रत आहे.शास्त्रातही सांगितले आहे,ज्यांना कन्या नसेल त्यांनी एकदातरी तुळशीचा विवाह लाऊन कन्यादानाचे पुण्य प्राप्त करुन घ्यावे. कार्तिकी एकादशी पासून तर त्रिपुरी पौर्णिमेपर्यंत तुलसी विवाह करण्याची प्रथा आहे.

त्रिपुरासुर नावाच्या राक्षसाने खडतर तप करून ब्रह्मदेवाकडून शत्रूंपासून भय राहणार नाही असा वर मागून घेतला होता. वरामुळे उन्मत्त होऊन तो सर्व लोकांना व देवांनासुद्धा खूप त्रास द्यायला लागला. त्रिपुरासुराची तीन नगरे असून त्याला अभेद्य तट होता. त्यामुळे देवांनाही त्याचा पराभव करता येईना. देवांनी भगवान शंकराची अखेर प्रार्थना केली.




तेव्हा शंकरांनी त्याची तिन्ही नगरे जाळून त्याला ठार केले. कार्तिक पौर्णिमेच्या दिवशी ही घटना घडल्यामुळे तिला त्रिपुरारी पौर्णिमा म्हणले जाऊ लागले.या दिवशी घरात, घराबाहेर व देवळातही दिव्याची आरास करून पूजा केली जाते तसेच नदीत दीपदान करतात. म्हणजेच नदीपात्रात पाण्यामध्ये दिवे लावून सोडतात. आनंदोत्सव साजरा करतात.

तुलसी विवाह झाल्या नंतर चातुर्मासात जी व्रत,संकल्प केले असतील त्याची समाप्ती करुन ते पदार्थ ब्राम्हणाला दान करून मग सेवन करण्याची पध्दत आहे. तुलसीविवाहा नंतरच विवाह मुहूर्त सुरु होतात.

हिंदू परंपरेने नुसार तुळशीच्या केवळ दर्शनाने हजारो गायी दान केल्याचे पुण्य लाभते. तिच्या पानावरचे उदक मस्तकावर धारण केलेतर गंगा स्नानाचे पुण्य लाभते. मरतेवेळी अंगावर तुळशीपत्र असेलतर व्यक्ती वैकुंठास जाते. इतके हिंदू धर्मात तुळशीचे महत्व आहे.

''तुळशीचे पान, एक त्रैलोक्य समान, उठोनिया प्रातःकाली वंदी तुलसी माऊलीनाही आणिक साधन, एक पूजन तुळशीचे न लगेच तिर्थाटना जाणे, नित्य पूजने तुळसीसी योगायोग न लगे काही, तुळशीवाचून देव नाही. ''अशा शब्दात संत एकनाथ महाराजांनी तुळशीचे श्रेष्टत्व सांगितले आहे

देवाला नैवेद्य दाखवताना आपण तुळशीच्या पानांचा वापर करतो.नैवेद्यावर तुळशीपत्र ठेवतो. आपला नैवेद्य देवापर्यंत लवकर पोचावा ही भावना असते. वाईट शक्ती आपल्यावर आक्रमण करु नाही म्हणूनच दाराशी तुळस लावण्याची प्रथा आहे. दारासमोर वृंदावन असते. जुन्या काही रूढी, परंपरा आहे त्यामागे नक्कीच काहीतरी हेतू होते. आजकाल आपणास बऱ्याच प्रमाणात विसर पडत चाललाय. काही ठराविक ठिकाणीच तुळशी वृंदावन बघायला मिळते.

तुळशीमध्ये कार्बन आ्क्साईड शोषून ऑक्सिजन वायू सोडण्याचा गुणधर्म असल्यामुळे शरिर निरोगी रहाण्यासाठी मदत होते.




घरासमोर तुळस असल्यास पिसवा, जंतू शिरकाव करत नाही.तुळस प्रदुषण नाशक आहे.हवा शुध्द करणे हा तिचा महत्त्वाचा गुणधर्म आहे. विज्ञान दृष्टीने तुलशी वनस्पती म्हणून खूप महत्वाची आहे.औषध म्हणून: तुळशीच्या पानांचा रस काढून पिणे अनेक आजारांवर गुणकारी ठरते, असे मानले जाते.

भारतीय उपखंडात आढळणारी ही वनस्पती औषधी आणि आध्यात्मिक दोन्ही दृष्ट्या महत्त्वाची मानली जाते. ती रोगप्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी, तणाव कमी करण्यासाठी, आणि डोकेदुखीपासून आराम देण्यासाठी उपयुक्त आहे.

तुळशीचे अनेक आरोग्य विषयक फायदे आहेत. तुळशीची पानात व्हिटॅमिन सी आणि अँटीऑक्सिडंट्सचा उत्तम स्रोत आहेत, ज्यामुळे रोगप्रतिकारशक्ती वाढते. ही वनस्पती अॅडाप्टोजेन म्हणून काम करते, ज्यामुळे शरीराला तणावाशी जुळवून घेण्यास मदत होते आणि शांत वाटते.तुळस एक नैसर्गिक वेदनाशामक आहे आणि मायग्रेनच्या वेदना कमी करण्यास मदत करू शकते.तुळशीचे सेवन पचन सुधारण्यास मदत करते आणि यूरिक ऍसिडची पातळी कमी करण्यास मदत करते.धार्मिक आणि आध्यात्मिक दृष्टीने तुळशीचे महत्त्व आहे.हिंदू धर्मात तुळशीला पवित्र मानले जाते आणि तिची पूजा केली जाते. असे मानले जाते की तुळशीचे रोप घरात असल्यास लक्ष्मीचा वास असतो आणि घरात सुख-समृद्धी येते.रविवारी तुळशीला पाणी घातले जात नाही, कारण या दिवशी ती भगवान विष्णूसाठी व्रत करते, अशीही धार्मिक मान्यता आहे.तुळस विविध पाककृतींमध्ये वापरली जाते, परंतु भारतीय तुळस ही गोड तुळशीपेक्षा वेगळी आणि थोडी तिखट असते.

हिंदूचे अंतःकरणात जसा तुळशिबद्दल पूज्यभाव, पवित्र भाव आहे, तसाच इतरही धर्मातही आदरभाव आहे.इंग्रजी शब्दकोषात तुळशीला ''पवित्र झाड म्हटले आहे.ग्रीक भाषेत तुळशीला ''बेझिलीकाँन'' म्हणजे राजयोग म्हणतात. तुळशीच्या अंगी विशिष्ट शक्ति आहे असे मानतात.

आपल्या हिंदू धर्मात तुळशीचे दर्शन, स्पर्श, ध्यान, नमन,पूजन, रोपण, आणि सेवन ह्या गोष्टी युगायुगांची पापे ,पातके,नष्ट करतात. म्हणूनच तुळशीला पापनाशिनी म्हणतात.

म्हणूनच म्हटले जाते, ''ज्या घरी तुळशीचे बन आहे, ते घर तीर्थक्षेत्रा सारखे पवित्र असते.

प्रत्येक हिंदू च्या घरी तुळस असावी असा संकेत आहे.प्रातःकाळी तुळशीचे दर्शन घ्यावे

***



# भारतरत्न सरदार वल्लभाई पटेल जयंतीनिमित्त रन फॉर युनिटी पदयात्रा

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

**छत्रपती संभाजीनगर**

– आज भारतरत्न सरदार वल्लभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त रन फॉर युनिटी पदयात्रा काढून राष्ट्रीय एकता दिन साजरा करण्यात आला जिल्हाधिकारी कार्यालय ते शहागंज येथील उद्यानात सरदार वल्लभभाई पटेल यांच्या पुतळ्याजवळ याचा समारोप करण्यात आला, या कार्यक्रमाच्या प्रसंगी नामदार अतुल सावे, खासदार डॉ. भागवत कराड जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री अंकित, जिल्हा युवा क्रीडा अधिकारी मेघा सनवार, मुख्य अभियंता अतुल चव्हाण, भाजपा महिला आघाडीच्या डॉक्टर उज्वला दहिफळे, माजी महापौर बापू घडामोडे  तसेच पोलीस अधिकारी, कर्मचारी, सामाजिक कार्यकर्ते व व्यापारी, लोकप्रतिनिधी मोठ्या संख्येने हजर होते. आज इथे येणाऱ्या व्यक्तींकरता कॅट या व्यापारी संघटनेतर्फे चहापाणी व बिस्किट व फराळाची व्यवस्था करण्यात आली होती. हा कार्यक्रम यशस्वी करण्याकरता संघटनेतर्फे श्री कचरू वेळजकर, श्री विजय जैस्वाल, श्री अनंत बोरकर,श्री संतोष मंत्री,श्री लक्ष्मीनारायण राठी, श्री हितेश कांकरिया, श्री पंकज वैष्णव  आदी हजर होते.

# राष्ट्रीय एकता दिनानिमित्त पदयात्रा

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

**छत्रपती संभाजीनगर** – स्वातंत्र्य लढा व स्वातंत्र्यानंतर अखंड भारत निर्माणात सरदार वल्लभभाई पटेल यांचे योगदान अमूल्य आहे. त्यांच्या या दृढनिश्चय आणि समर्पित योगदानाचे स्मरण करीत आपण प्रत्येक जण देशाच्या एकात्मतेसाठी सदैव कटीबद्ध राहू या, असे आवाहन राज्याचे इतर मागासवर्ग बहुजन कल्याण, अपारंपारिक उर्जा मंत्री अतुल सावे यांनी आज येथे केले.

लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त  भारत सरकारच्या युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालयाच्यावतीने एकता पदयात्रेचे आयोजन करण्यात आले. या पदयात्रेचा समारोप शहागंज येथील उद्यानात सरदार वल्लभभाई पटेल यांच्या पुतळ्याजवळ करण्यात आला. त्यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

राज्यसभा खासदार डॉ. भागवत कराड, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अंकीत, मुख्य अभियंता अतुल चव्हाण, निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते, जिल्हा पुरवठा अधिकारी प्रवीण फुलारी, क्रीडा उपसंचालक शेखर पाटील, जिल्हा युवा अधिकारी मेघा सनवार, जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्य) आश्विनी लाठकर, जिल्हा क्रीडा अधिकारी बाजीराव देसाई तसेच अन्य अधिकारी, कर्मचारी, लोकप्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते आदी उपस्थित होते.

पदयात्रा सकाळी ७.३० वा. जिल्हाधिकारी कार्यालयापासुन सुरु झाली. तेथून 'भारत माता की जय', 'सरदार वल्लभभाई पटेल अमर रहे', अशा घोषणा देत ही पदयात्रा जिल्हाधिकारी कार्यालय ते सरदार वल्लभभाई पटेल पुतळा, शहागंज येथे आली. तेथे सरदार वल्लभभाई पटेल यांच्या पुतळ्यास अभिवादन करण्यात आले.

येथे  उपस्थितांना राष्ट्रीय एकात्मतेची शपथ देण्यात आली. तसेच स्वदेशी वस्तू वापराबाबत शपथ देण्यात आली. यावेळी खा. डॉ. भागवत कराड यांनी सरदार पटेल यांच्या राष्ट्र उभारणीतील योगदानाची उपस्थितांना माहिती दिली. त्यानंतर मंत्री अतुल सावे यांनी उपस्थितांना संबोधित केले व सरदार पटेल यांच्या जयंतीनिमित्त देशाच्या एकात्मतेसाठी कटीबद्ध राहण्याचे आवाहन केले.

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559